परात्पर गुरु डॉ. आठवले यांची साधकांचे कौतुक करणारी कविता

# ८ ‘साधकांनो, तुम्ही जिंकलात, मी हरलो !’

## मनोगत

‘वर्ष १९९३ पासून सनातनचे कार्य खर्‍या अर्थाने चालू झाले. आरंभी सनातनचे नाव समाजात फारसे नव्हते, तरीही साधनेचे महत्त्व कळल्यानंतर अनेक साधकांनी पूर्णवेळ साधना करण्यास आरंभ केला. सनातनचे अध्यात्मप्रसाराचे कार्य जसजसे वाढू लागले, तसतसा साधकांना स्थुलासमवेत सूक्ष्मातून होणारा, म्हणजे वाईट शक्तींचा विरोधही वाढू लागला. साधकांना होणार्‍या आध्यात्मिक त्रासांचे प्रमाणही वाढले. वर्ष २००६ पासून सनातनचे राष्ट्र आणि धर्म यांविषयीचे कार्य वेगाने वाढले. तेव्हापासून तर साधकांना अधिक प्रमाणात विरोधाला सामोरे जावे लागत आहे.

असे सर्व असतांनाही आतापर्यंत साधकांनी माझ्यावर विश्वास ठेवून आणि ईश्वरावरील श्रद्धेपोटी अन्य कोणताही विचार न करता स्वतःला साधनेत पूर्णपणे झोकून दिले आहे. साधकांनी दैनंदिन जीवनात भेडसावणार्‍या शारीरिक, कौटुंबिक, आर्थिक इत्यादी समस्या आणि स्वतःचा भविष्यकाळ यांची कधीच चिंता केली नाही अन् ते सतत साधनारत राहिले. मलाही जे जमले नसते, ते साधकांनी करून दाखवले; म्हणूनच मला साधकांचे अतिशय कौतुक वाटते. यामुळेच मी वर्ष २००६ मध्ये ‘साधकांनो, तुम्ही जिंकलात, मी हरलो !’, याची काही उदाहरणे आणि कविता लिहू शकलो.

मी लिहिलेल्या कवितेवर काही साधकांनी कृतज्ञता म्हणून व्यक्त केलेले विचार आणि कविता हेसुद्धा प्रस्तुत ग्रंथात प्रसिद्ध केले आहे. साधकांच्या लिखाणातून त्यांची साधनेकडे पहाण्याची दृष्टी, ईश्वरप्राप्तीची तळमळ, भाव, शरणागती इत्यादी गुणांचे मला दर्शन झाले. ‘कुणी कौतुक केल्यावर त्याकडे साधनेच्या दृष्टीने कसे पहायचे’, हे मला साधकांकडून शिकायला मिळाले.

खरेतर मी केलेल्या कवितेपेक्षा माझ्या कवितेवर साधकांनी केलेल्या कविता मला अधिक आवडल्या. ‘शिष्यात् इच्छेत् पराजयम् ।’, म्हणजे

'गुरूंनी शिष्याकडून हरण्याची इच्छा करावी, (म्हणजे 'शिष्य आपल्यापेक्षाही कुशल व्हावा', अशी इच्छा)' 'हरण्यातही आनंद असतो', हे शिकवण्यासाठी साधकांनी मला सातत्याने या कवितेच्या निमित्तानेही हरवले ! आताही अनेक साधकांची गुणवैशिष्ट्ये पाहिल्यावर 'मी सातत्याने त्यांच्याकडून हरत आहे', असे मला वाटते. मला हरवणाऱ्या काही साधिकांची नावेही मी ग्रंथात आरंभीच्या पानात दिली आहेत.

'उत्तम शिष्य लाभणे', हे गुरूंचे भाग्य असते. सर्वसाधारणपणे गुरूंना केवळ ३ - ४ उत्तम शिष्यच लाभतात; परंतु 'सनातनला असे शेकडो साधक लाभणे', हे मी सनातनचे आणि माझे भाग्य समजतो. यासाठी मी साधकांप्रती कृतज्ञता व्यक्त करतो. स्वतःच्या प्राणांपेक्षाही 'सनातन हिंदु धर्माचा प्रसार' आणि 'हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचे कार्य' यांना महत्त्व देणाऱ्या अशा अनेक साधकांसाठी पुन्हा एकदा म्हणावेसे वाटते, 'साधकांनो, तुम्ही जिंकलात, मी हरलो !'

**- (परात्पर गुरु) डॉ. जयंत आठवले (१५.८.२०२०)**


**परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले रचित**

## आध्यात्मिक काव्यसंग्रह !

**(एक विद्वान, संत आणि साधक यांनी कवितांवर केलेल्या भाष्यांसह)**



या काव्यसंग्रहातील बहुतांश कविता देवतांप्रती भक्तीभाव वाढवणाऱ्या, तसेच क्षात्रतेज आणि ब्राह्मतेज जागृत करणाऱ्या आहेत. वाचकाच्या अंतर्मनाचा ठाव घेणाऱ्या या कविता साधना तळमळीने होण्यासाठीही अत्यंत लाभदायक आहेत. कोणत्याही मार्गाने साधना करणाऱ्यांसाठी हा काव्यसंग्रह म्हणजे एक 'अमूल्य ठेवा'च आहे !

# अनुक्रमणिका

[काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे (मुद्दे) ‘*’ या चिन्हाने दर्शवली आहेत.]

**१. परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी लिहिलेली ‘साधकांनो, तुम्ही जिंकलात, मी हरलो’ याची काही उदाहरणे आणि संबंधित कविता १३**

**२. ‘साधकांनो, तुम्ही जिंकलात...’ या कवितेवर सनातनचे संत आणि साधक यांनी पद्यात व्यक्त केलेले विचार १७**

**३. ‘साधकांनो, तुम्ही जिंकलात...’ या कवितेवर संत अन् साधक यांनी गद्यात व्यक्त केलेले विचार ५२**

३ अ. संतांनी व्यक्त केलेले विचार ५२

* ‘शिष्यात् इच्छेत् पराजयम् ।’, या वृत्तीचे प.पू. डॉक्टर ! – परात्पर गुरु पांडे महाराज ५२

* ‘ईश्वर कधीही हरत नसतो !’ – प.पू. दास महाराज ५४

* ‘गुरुकृपेची माया अनुभवणे’ – सद्गुरु डॉ. मुकुल गाडगीळ ५५

३ आ. साधकांनी व्यक्त केलेले विचार ५६

**४. ‘साधकांनो, तुम्ही जिंकलात...’ ही कविता वाचून संत आणि साधक यांना आलेल्या अनुभूती ८८**

**५. ‘साधकांनो, तुम्ही जिंकलात...’ या कवितेवर मिळालेले ज्ञान १०१**

५ अ. एक विद्वान [श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ यांच्या माध्यमातून] १०१

५ आ. विश्वनाथ देवता (श्री. धनंजय राजहंस यांच्या माध्यमातून) १०३

५ इ. ईश्वर (कु. मधुरा भोसले यांच्या माध्यमातून) १०५

५ ई. सौ. कोमल किरण जोशी यांच्या माध्यमातून १०६

५ उ. एक ज्ञानी (श्री. निषाद देशमुख यांच्या माध्यमातून) १०६